सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

डॉ. सविता कुलकर्णी
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

संदर्भ क्र. विविमं/२०२६–२७/३३४ **नावनोंदणीस मुदत वाढ** दिनांक : ३०/०९/२०२६.

प्रति,
**मा. प्राचार्य/ मा. संचालक,**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था.

विषय : महाविद्यालयीन नियतकालिकांच्या संपादक मंडळातील सदस्य व विद्यार्थ्यांसाठी आयोजित जिल्हानिहाय नियतकालिक कार्यशाळा नावनोंदणीस मुदतवाढ.

संदर्भ : या कार्यालयाचे पत्र क्र. विविमं/२०२६–२७/२६३, दि. १६/०९/२०२६ चे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालय व परिसंस्थांतील नियतकालिकाच्या संपादक मंडळातील सदस्य यांच्या कार्यशाळेसाठी नियतकालिकाच्या संपादक मंडळातील कमाल २ सदस्य तसेच १ विद्यार्थी यांना सदर कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी ऑनलाईन (Online) पद्धतीने दिनांक ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत नावनोंदणी करण्याबाबत कळविण्यात आले होते.

**सदर जिल्हानिहाय नियतकालिक कार्यशाळेसाठी ऑनलाईन (Online) पद्धतीने नावनोंदणी करण्याची मुदत गुरूवार, दिनांक ०८ ऑक्टोबर २०२६ पर्यंत वाढविण्यात येत आहे**. तरी आपल्या महाविद्यालय/ परिसंस्थेतील नियतकालिकाच्या संपादक मंडळातील कमाल २ सदस्य तसेच १ विद्यार्थी यांना सदर कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी (www. unipune.ac.in –BOD - BOD Online – Login–Online Services – Students Developement- Menu- नियतकालिक कार्यशाळा नावनोंदणी) येथे ऑनलाईन (Online) पद्धतीने गुरूवार, दिनांक ०८ ऑक्टोबर २०२६ पर्यंत नावनोंदणी करण्याबाबत सूचित करावे.
(ही माहिती ऑनलाईन पद्धतीने फक्त जतन/सबमिट करावी. या भरलेल्या माहितीची प्रिंट व अपलोड करण्याची सुविधा उपलब्ध नाही.)

कार्यशाळेची दिनांक, वेळ, स्थळ नंतर स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. तरी मुदत वाढीबाबत आपल्या महाविद्यालयातील संबंधित संपादक मंडळातील सदस्य व विद्यार्थ्यांना अवश्य अवगत करून वाढीव मुदतीत नावनोंदणी करून घेण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत सूचित करावे, कळावे, ही विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे.
**(टीप :नियतकालिक कार्यशाळेसाठी संदर्भीय पत्रान्वये यापूर्वी नावनोंदणी केली असल्यास पुन:श्च नावनोंदणी करण्याची आवश्यकता नाही.)**

**(प्रा. डॉ. सविता कुलकर्णी)**
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

**ऑनलाईनबाबत अधिक माहिती व संपर्कासाठी** : (०२०–७१५३३६३३)
Email: nssbsdsupport@pun.unipune.ac.in
विद्यार्थी विकास मंडळ कार्यालयीन अधिक माहितीसाठी : ०२०–२५६२२६८०

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.
डॉ. सविता कुलकर्णी
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

संदर्भ क्र. विविमं/२०२६–२७/२६३ दिनांक : १६/०९/२०२६.

प्रति,
**मा. प्राचार्य/ मा. संचालक,**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था.

विषय : महाविद्यालयीन नियतकालिकांच्या संपादक मंडळातील सदस्य व विद्यार्थ्यांसाठी आयोजित जिल्हानिहाय नियतकालिक कार्यशाळेसाठी नावनोंदणी करण्याबाबत.

महोदय/महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांमध्ये प्रकाशित होणारी नियतकालिके ही विद्यार्थ्यांच्या साहित्यिक, सांस्कृतिक, कलात्मक व सर्जनशील अभिव्यक्तीस व्यासपीठ उपलब्ध करून देणारे महत्त्वाचे माध्यम आहे. विद्यार्थ्यांमध्ये लेखन, वाचन, चिंतन, चिकित्सक दृष्टी, संपादनकौशल्य व सर्जनशीलतेचा विकास करण्यामध्ये महाविद्यालयीन नियतकालिकांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे.

या अनुषंगाने महाविद्यालयीन नियतकालिकांची आशयात्मक व संपादकीय गुणवत्ता वृद्धिंगत करणे, नियतकालिक निर्मितीच्या विविध टप्प्यांबाबत आवश्यक मार्गदर्शन उपलब्ध करून देणे तसेच संपादक मंडळातील सदस्य व विद्यार्थ्यांमध्ये संपादन, लेखन व सादरीकरणाची कौशल्ये विकसित करणे या उद्देशाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळाच्या वतीने माहे ऑक्टोबर २०२६ मध्ये जिल्हानिहाय 'महाविद्यालयीन नियतकालिक संपादक मंडळ सदस्याच्या मार्गदर्शन कार्यशाळेचे' आयोजन करण्याचा मानस आहे.

सदर कार्यशाळेमध्ये नियतकालिकाचे नियोजन व संकल्पना, संपादकीय लेखन, साहित्यिक व सर्जनशील लेखन, लेख व साहित्यकृतींची निवड, संपादन प्रक्रिया, भाषा व शुद्धलेखन, मांडणी व सादरीकरण, दृक–सजावट, डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर तसेच आधुनिक काळातील महाविद्यालयीन नियतकालिकांसमोरील विविध संधी व आव्हाने आदी विषयांवर तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन आयोजित करण्यात येणार आहे. ही कार्यशाळा महाविद्यालयीन नियतकालिकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या साहित्यिक व सर्जनशील प्रतिभेला चालना देण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरेल, असा विश्वास वाटतो.

तरी आपल्या महाविद्यालयातील नियतकालिकाच्या संपादक मंडळातील कमाल २ सदस्य तसेच १ विद्यार्थी यांना सदर कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी **(www. unipune.ac.in –BOD - BOD Online – Login–Online Services – Students Developement- Menu- नियतकालिक कार्यशाळा नावनोंदणी) येथे ऑनलाईन (Online) पद्धतीने दिनांक ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत** नावनोंदणी करण्याबाबत सूचित करावे. (ही माहिती ऑनलाईन पद्धतीने फक्त जतन/सबमिट करावी. या भरलेल्या माहितीची प्रिंट व अपलोड करण्याची सुविधा उपलब्ध नाही.)

**कार्यशाळेची दिनांक, वेळ, स्थळ नंतर स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.** तरी आपल्या महाविद्यालयातील संबंधित संपादक मंडळातील सदस्य व विद्यार्थ्यांना सदर कार्यशाळेबाबत अवगत करून विहित मुदतीत नावनोंदणी करून घेण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत सूचित करावे, कळावे, ही विनंती.

(प्रा. डॉ. सविता कुलकर्णी)
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ